**2024 III 07** **0930** **Seat No.** | | | | | |

**Time : 3 Hours** **MARATHI LANGUAGE II**

**Subject Code**

| H | 4 | 4 | 2 | 3 |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 42** **(Printed Pages : 8)** **Maximum Marks : 80**

**सूचना :** (*i*) शुद्धलेखनाचे नवीन नियम पाळावेत.

(*ii*) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

## विभाग I – व्याकरण

खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा :

1. माणूस 1

2. कोमल 1

3. आंधळा. 1

खालील शब्दांची विशेषणे लिहा :

4. मेहनत 1

5. दया 1

6. राष्ट्र 1

खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :

7. सावली 1

8. कृतघ्न 1

9. जय 1

खालील शब्दांचे लिंग बदला :

10. गाय 1

11. पुरुष 1

12. जादुगार 1

खालील शब्दांचे वचन बदला :

13. गोट्या 1

14. पेढा 1

15. फांद्या. 1

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा :

16. मृत्यूच्या क्षणा<u>पासून</u> फार उशीर झाला की <u>डोळे</u> दान करण्यायोग्य उरत नाहीत <u>परंतु</u> आशूचे नेत्रदान यशस्वी <u>झालं</u>. 4

## विभाग 2 – गद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा :

17. स्वाती नक्षत्रावरील पाऊस समुद्रात पडल्यावर काय पिकतं ? 1

18. यत्नदेवाच्या पूजेसाठी कोणत्या गुणांची आवश्यकता असते असे लेखक पोतदार म्हणतात. 1

19. लहानपणी श्यामच्या घरी खर्वस घेऊन कोण येत होती ? 1

खाली दिलेली वाक्ये योग्य पर्याय निवडून पूर्ण करा :

20. डॉ. माशेलकरांचे एक शिक्षक नेहमी सांगायचे ...................... 1

(अ) निसर्ग हा सर्वात मोठा गुरु आहे

(आ) निसर्ग हा सर्वात मोठ कवी आहे

(इ) निसर्ग हा सर्वात मोठा वैज्ञानिक आहे

21. मंगेश देव असूनही कधी आवडला नाही एवढे चित्रातले ते गांधीजी तेव्हा आवडत असत कारण ................................ 1

(अ) त्यांचे ते गोल केशहीन मस्तक

(आ) त्यांची तो झपाझप चालणारी चाल

(इ) त्यांचे ते लहान मुलांसारखे निर्मळ, स्वच्छ हास्य

22. कर्णाने कुंतीसाठी निरोप पाव्वला ................................ 1

(अ) शोक करायची वेळ आली तरीही शोक करच!

(आ) शोक करायची वेळ आली तरी शोक करू नकोस!

(इ) शोक करायची वेळ आली नाही तरीही शोक करच!

खालील वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :

23. 'कारण मी परवाच्या दिवशी सत्यनारायणाची पूजा करण्याचे योजिले आहे'. 5

**किंवा**

''तुला दहा डबे नंतर विकत घेऊन देतो आधी तू बाहेर पड.''

खालील प्रश्नाचे उत्तर **7** ते **8** ओळीत लिहा :

24. 'काझिरंगा अभयारण्य' या पाठात शिकारचोर गेंड्याची शिकार कशी करतात ? 5

**किंवा**

विनाकारण लाथ मारणाऱ्या केळकरीण बाईची मांजर झालेल्या लेखकाने खोड कशी मोडली ?

**विभाग 3 – पद्य**

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा :

25. कोणाच्या संगतीत राहून भक्तीमार्ग प्राप्त करू शकतो असे संत सोहिरोबानाथ म्हणतात ? 1

26. सागराने भूमातेला कोणते वचन दिले ? 1

27. कवी बा. भ. बोरकरांनी कोणत्या हातांना देखणे हात म्हटले आहे ? 1

खाली दिलेल्या कवितेच्या ओळी योग्य पर्याय निवडून पूर्ण करा :

28. .................. झालासे कळस। भजन करा सावकास॥ 1

29. आसवेंच .......................... आम्हाला मिळाली. 1

30. मी असा आनंदुनी .......................... होता। 1

शब्दगंधे, तू मला बाहूंत घ्यावे.

[पारतंत्र्याची, तुका, स्वातंत्र्याची, बेहोष, एका]

खालील पद्यांशाचे संदर्भासह स्पष्टीकरण करा :

31. सद्‌गुरुराया माझा आनंदसागर

त्रैलोक्या आधार गुरुराव॥ 5

**किंवा**

काट्यासारखं सलायचं

की फुलासारखं फुलायचं

तुम्हीच ठरवा.

खालील प्रश्नाचे उत्तर **7** ते **8** ओळीत लिहा :

32. संत नामदेवांनी आपल्या मनाची अवस्था कोणकोणत्या उदाहरणांतून स्पष्ट केली आहे ? 5

**किंवा**

ग्रामीण मुलीची शिक्षण घेण्याची तळमळ 'माये ग माये' या कवितेत कशी दिसून येते ?

## विभाग 4 – लेखन

खाली दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य पर्याय निवडून लिहा.

33. भांबावून जाणे .................................. 1

- मोठ्याने ओरडणे
- निघून जाणे
- गोंधळून जाणे
- वश करून घेणे

34. अवहेलना करणे ........................... 1

- प्रयत्न करणे
- हेटाळणी करणे
- प्राप्त करणे
- प्रार्थना करणे

35. हलकल्लोळ माजणे ............................ 1

- उतावीळ होणे
- मोठ्याने हसणे
- हल्ला करणे
- आरडाओरड करणे

36. प्रतारणा करणे ........................ 1

- फसवणे
- निवाडा देणे
- वाट लावणे
- विश्वासघात करणे

खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :

आळस सोडायचा म्हणजे परिश्रम करावयाचे. आळस जिंकण्याचा हाच एक उपाय आहे. हा उपाय अंमलात आणला नाही तर त्याची शिक्षा ही निसर्ग भोगावयास लावील. रोगाच्या किंवा अन्य कोणत्या तरी रूपाने शिक्षा भोगणे सुटत नाही. शरीर ज्याअर्थी आम्हांला दिलेले आहे. त्याअर्थी श्रम हे करावे लागणारच. शरीर श्रमामध्ये गेलेला वेळ फुकट जात नाही, त्याचा मोबदला मिळतो. आरोग्य उत्तम लाभते. बुद्धी सतेज, तीव्र व शुद्ध होते. पुष्कळ विचारवंताच्या विचारातही त्यांच्या पोटदुखीचे व डोकेदुखीचे प्रतिबिंब उमटते. विचारवंत जर उन्हात, मोकळ्या हवेत, सृष्टीच्या सान्निध्यात मेहनत करील तर त्याचे विचारही तेजस्वी होतील. शारीरिक रोगाचा जसा मनावर परिणाम होतो, त्याप्रमाणे शारीरिक आरोग्याचाही मनावर परिणाम होतो ही अनुभवाची गोष्ट आहे. पुढे क्षयरोग जडल्यावर पाचगणीला टेकडीवर हवा खावयास जायचे किंवा सूर्यकिरणांचे प्रयोग करावयाचे त्याच्या आधीच बाहेर पडून बागेला पाणी घातले, लाकडे फोडली तर काय होईल ?

प्रा. श्रीकांत नाईक

**प्रश्न :**

37. आळस सोडायचा म्हणजे काय करायचे ? 1

38. श्रम केल्यामुळे आपल्या शरीरमनाला कोणते फायदे होतात ? 2

39. विचारवंताचे विचार तेजस्वी कसे होतील ? 2

40. 'संस्कृती उच्च माध्यमिक विद्यालय मडगांव' येथे संपन्न झालेल्या 'स्वच्छता दिवस' कार्यक्रमाचा वृत्तांत **10** ते **12** ओळीत लिहा. 5

41. 'व्यायामाची गरज' या विषयावर दोन मित्र/मैत्रिणीमधील संवाद सुमारे **10** ते **12** ओळीत लिहा. 5

42. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे पंचवीस ओळींचा निबंध लिहा. 10

माझ्या स्वप्नातील समृद्ध गोवा

**किंवा**

जंगले नष्ट झाली तर…………

**किंवा**

भारताची वैज्ञानिक भरारी–चांद्रयान 3

**किंवा**

माझा आवडता थोर समाजसुधारक

**किंवा**

पावसाचे मनोगत